# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांक:06.08.2024 वारःमंगळवार

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना 'द कंपेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी' हा फिजीचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
2. बांगलादेशची संसद बरखास्त करून हंगामी सरकार स्थापन केलं जाईल-बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांची माहिती
3. तामिळनाडूमधल्या सुलार इथं 'तरंग शक्ती 2024' या पहिल्या बहुराष्ट्रीय हवाई युद्ध सरावाला आजपासून प्रारंभ
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या अविनाश साबळेनं रचला इतिहास; तीन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात अंतिम फेरीत धडक आणि
5. भारताच्या पुरुष हॉकी संघाची उपान्त्य फेरीत आज जर्मनीविरुद्ध लढत

**<u>राष्ट्रपती-फिजी</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना 'द कंपेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी' या फिजीच्या सर्वोच्च नागरी सन्मानानं गौरव करण्यात आला. फिजीचे राष्ट्रपती विलयम काटोनिवेरे यांनी राष्ट्रपती मुर्मु यांना हा सन्मान प्रदान केला. तसंच त्यांना फिजीच्या लष्कराकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी सुवा इथं भारतीय समुदायाला संबोधित केलं. सध्या फिजीच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून त्यांचा राष्ट्रपति मुर्मू यांनी फिजीचे राष्ट्रपती काटोनिवेरे आणि पंतप्रधान सिटिव्हनी राबुका यांच्यासमवेत राजधानी सुवा इथं द्विपक्षीय बैठकीत परस्परसंबंध अधिक दृढ करण्याबाबत चर्चा केली. भारताच्या सहकार्यानं गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये सुरू करण्यात आलेल्या सौर प्रकल्पाचीही राष्ट्रपतींनी पाहणी केली, तसंच काल फिजीच्या संसदेलाही संबोधित केलं. फिजीच्या दौऱ्यानंतर राष्ट्रपती मुर्मू 7 ते 9 ऑगस्ट दरम्यान न्यूझीलंडला जाणार आहेत. तर 10 ऑगस्टला त्या तिमोर लेस्टे देशाला भेट देणार आहेत.

**<u>विनियोजन विधेयक</u>**

केंद्रीय अर्थसंकल्पात विविध मंत्रालयांनी प्रस्तावित केलेल्या खर्चाशी संबंधित अनुदानाच्या थकबाकी मागण्या लोकसभेत काल मंजूर करण्यात आल्या. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या विनियोजन विधेयकालाही सभागृहानं मंजुरी दिली.

**<u>राज्यसभा-वाण</u>**

विविध पिकांचे दीड हजार पर्यावरणस्नेही वाण येत्या 5 वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अशा 109 वाणांचं लोकार्पण लवकरच पंतप्रधानांच्या हस्ते होणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी काल राज्यसभेत सांगितलं.

**<u>बांगलादेश</u>**

बांगलादेशची संसद बरखास्त करून हंगामी सरकार स्थापन केलं जाईल, असं बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी म्हटलं आहे. ढाका इथल्या बंगभवन इथं तिन्ही सैन्य दलांच्या प्रमुखांच्या उपस्थितीत विविध राजकीय पक्षांचे नेते आणि प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत काल त्यांनी ही माहिती दिली. बांगलादेशमधली सध्याची अराजकता दूर करण्यासाठी लष्कराची मदत घेण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं. नजरकैदेत असलेल्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षा आणि

माजी पंतप्रधान खालिदा झिया यांची सुटका करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. सध्या सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान अटक केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची सुटका करण्याचे आदेशही राष्ट्रपती शहाबुद्दीन यांनी दिले. दरम्यान बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा देऊन लष्करी विमानातून देश सोडला. बांगलादेशमधल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्करानं पावलं उचलली. लष्कर प्रमुख जनरल वकार-उझ-जमान लवकरच विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रतिनिधींची भेट घेणार असल्याचं लष्कराच्या जनसंपर्क विभागानं म्हटलं आहे. तसंच आज सर्व सरकारी आणि निमसरकारी कार्यालये, खासगी कार्यालये, कारखाने, शाळा, महाविद्यालये, मदरसे आणि विद्यापीठांसह सर्व शैक्षणिक संस्था सुरू राहतील, असंही जनरल जमान यांनी सांगितलं.

**सीसीएस बैठक**

दरम्यान बांगलादेश मधील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सुरक्षा समितीची बैठक काल नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, आणि वित्तमंत्री निर्मला सीतरामन यांच्यासह अन्य मंत्री उपस्थित होते.

**अमेरिक-बांग्लादेश**

बांग्लादेशमध्ये हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतर सर्व निर्णय लोकशाहीच्या तत्वांनुसार घेतले जावेत असं आवाहन अमेरिकेनं केलं आहे. हिंसा थांबवण्यासाठी तातडीनं पावलं उचलण्याची गरज असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यु मिलर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितलं.

**बीमस्टेक**

बीमस्टेकच्या व्यापार परिषदेचं आज नवी दिल्लीत आयोजन करण्यात आलं आहे. परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत या परिषदेचं उद्घाटन होईल. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत भारतासह बांगलादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आणि थायलंड या बीमस्टेकच्या सदस्य देशांमधील अनेक मंत्री, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी, धोरणकर्ते, उद्योजक उपस्थित असणार आहेत. शाश्वत विकास, व्यापार सुविधा, प्रादेशिक दळणवळण, ऊर्जा सुरक्षा, सर्वसमावेशक वृद्धी आदी मुद्यांवर या परिषदेत चर्चा होणार आहे.

**तरंगशक्ती**

तामिळनाडूमधल्या सुलार इथं 'तरंग शक्ती 2024' या पहिल्या बहुराष्ट्रीय हवाई युद्ध सरावाला आजपासून प्रारंभ होणार आहे. या सरावात जवळपास 30 देश सहभागी होत असून त्यापैकी दहा देश लढाऊ विमानांसह सहभागी होत आहेत. हा सराव दोन टप्प्यांत आयोजित केला असून पहिलं टप्पा आजपासून ते 14 ऑगस्टपर्यंत तामिळनाडूतल्या सुलार इथं तर दुसरा टप्पा 29 ऑगस्ट ते 24 सप्टेंबर दरम्यान राजस्थानमधल्या जोधपूर इथं हा सराव होणार आहे, अशी माहिती भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख, एअर मार्शल ए पी सिंग यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना दिली. तेजस, राफेल, मिराज 2000, जग्वार, मिग 29 यासह भारताची इतर लढाऊ विमानं या युद्ध सरावात भाग घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. या युद्ध सरावादरम्यान प्रशिक्षण, भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना भेट आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**ऑलिम्पिक साबळे**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अविनाश साबळे याने काल ऐतिहासिक कामगिरी करत पुरुषांच्या 3 हजार मीटर स्टीपलचेस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. महाराष्ट्रातील बीडचा सुपुत्र असलेल्या अविनाशनं काल रात्री झालेली ही शर्यत पाचव्या क्रमांकानं पूर्ण करत 8 मिनिट आणि 15 पूर्णांक 43 सेकंदांची वेळ दिली आणि अंतिम फेरीत आपलं स्थान पक्क केलं. येत्या 8 ऑगस्टला ही अंतिम फेरी होणार आहे.

टेबल टेनिस सांघिक प्रकारात भारताच्या महिला खेळाडू मानिका बत्रा, श्रीजा अकुला, आणि अर्चना कामत यांनी रोमानियाच्या संघाचा 16 व्या फेरीत 3-2 असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज हॉकी, अथलेटिक्स, टेबल टेनिस आणि कुस्ती या प्रकारात होणाऱ्या स्पर्धेत भारतीय खेळाडू सहभागी होणार आहेत. हॉकीमध्ये आज भारताचा उपांत्य फेरीतील सामना जर्मनीशी होणार आहे. पुरुषांच्या भाला फेक स्पर्धेत गतविजेता नीरज चोप्रा आज ब गटातील पात्रता फेरीमध्ये सहभागी होणार आहे. किशोर कुमार जेनाही अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित करण्यासाठी खेळणार आहे. किरण पहल महिलांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीमध्ये सहभागी होणार आहे. महिलांच्या 50 किलो वजनी गटात उपान्त्यपूर्व फेरीत विनेश फोगटचा सामना जपानच्या सुसाकी युई बरोबर होणार आहे. टेबल टेनिसच्या सांघिक प्रकारामध्ये हरमीत देसाई, मानव ठक्कर, आणि अचंता शरत कमल यांचाही सामना आज होणार आहे. बॅडमिंटनमध्ये लक्ष सेनचं आव्हान काल संपुष्टात आलं. नेमबाजीच्या सांघिक प्रकारात अनंत जीत सिंग नरुका आणि महेश्वरी चौहान यांचा, तर कुस्तीत निशा दहियाला पराभव पत्करावा लागला आहे.

**<u>आसाम-पूर</u>**

आसाममधल्या गुवाहाटीमध्ये काल संध्याकाळी मुसळधार पाऊस झाल्यानं अचानक आलेल्या पुरामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. गुवाहाटीमधल्या अनेक भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यानं रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. या पुरामुळे गुवाहाटी महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयं, शिकवणी वर्ग आणि सर्व शैक्षणिक संस्था आज बंद राहतील.

**<u>उत्तराखंड</u>**

उत्तराखंडमध्ये, केदार खोऱ्यात हवामानात सुधारणा झाल्यानं 1400 हून अधिक लोकांना भारतीय वायुसेनेनं हेलिकॉप्टरच्या मदतीनं सुरक्षित ठिकाणी हलवलं. हे सगळेजण पावसामुळं खचलेल्या ट्रेक मार्गावर अडकून पडले होते. याशिवाय वायुदलानं राज्य सरकारच्या हेलिकॉप्टरद्वारे 136 यात्रेकरूंची सुखरूप सुटका केली. तर 509 यात्रेकरूंना केदारनाथ इथून लिंचोली इथं आणण्यात आलं. याशिवाय गौरीकुंड इथून सोनप्रयाग मार्गे 584 जणांची आणि चौमासी मार्गे 172 जणांची सुटका करण्यात आली. गुरुवारी बचाव कार्य सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत 11 हजार 775 हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. दरम्यान लष्करानं केदारनाथ राष्ट्रीय महामार्गावरील सोनप्रयाग-गौरीकुंड रस्त्यावर फूटब्रिज बांधण्याचं काम सुरू केलं आहे.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

अमरनाथ यात्रेसाठी अठराशे 73 यात्रेकरूंची आणखी एक तुकडी जम्मूतल्या भगवती नगर यात्री निवास इथल्या तळ शिबिरातून काश्मीर खोऱ्याच्या दिशेनं रवाना झाली. 69 वाहनांच्या या ताफ्यात पंधराशे 79 पुरुष, 202 महिला, 65 साधू आणि 27 साध्वीचा समावेश आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.